ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २१ मे, १९५८ | अंक २१

## विविध माहिती

**क्षयरोगावर नवें औषध**—जपानी संशोधकांनीं क्षयरोगावर नवीन औषध शोधून काढल्याचा दावा केला आहे. नव्या औषधाचा ७६ क्षयरोग्यांवर उपचार केला असतां आश्चर्यकारक गुण दिसून आला, असें त्यांचें म्हणणें आहे. औषधाचा परिणाम दिसूं लागण्यास सुमारें ३ ते ४ महिन्यांचा अवधी लागतो.

**मॉस्कोच्या मध्यभागाची पुनर्घटना**—मॉस्को शहराच्या मध्यभागाची पुनर्घटना करण्याची २० वर्षांची योजना आखण्यांत आली आहे. सध्यां क्रेमलिन राजवाड्याच्या भोंवतीं असलेली हिरवळ वाढविण्यांत येऊन तिची व्याप्ति ३७० एकरांपर्यंत करण्यांत येणार आहे. खुद्द राजवाड्यांत पदार्थसंग्रहालय स्थापन करण्यांत येणार आहे.

**रेल्वे फाटकावर होणारे अपघात**—भारतामधील रेल्वेमार्गावरील ज्या फाटकांपाशीं फाटक उघडण्यास व बंद करण्यास मनुष्य नसतो, अशीं सुमारें ३०,००० रेल्वेचीं फाटकें आहेत ! ह्या ठिकाणीं रेल्वे ओलांडतांना होणारे अपघात टाळण्यासाठी एंजिन ड्रायव्हरांना शिटी वाजविण्याची सूचना देणारे बोर्ड लावण्यांत येणार आहेत.

**दक्षिणेंतील उच्च तंत्रशाळा**—दक्षिण हिंदुस्थानसाठी काढण्यांत यावयाच्या उच्च तांत्रिक शिक्षणाच्या शाळेसाठी पश्चिम जर्मन सरकारकडून मदत मिळणार आहे. ह्या संस्थेच्या स्थापनेसाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारत सरकारनें दोन कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

**भिक्षेच्या धंद्याची पहाणी**—मध्यप्रदेशांतील इंदूर, ग्वाल्हेर, उज्जैन, रेवा, रायपूर, जबलपूर आणि भोपाळ ह्या सात शहरांतील भिकाऱ्यांच्या जीवनाची पहाणी करण्यांत येणार आहे. भीक मागण्याचे निरनिराळे प्रकार व भिकाऱ्यांना प्रामाणिक व्यवसाय करून जगूं देण्याचे प्रयत्न करणाऱ्या संस्था, ह्यांचा समावेश पहाणींत करण्यांत येणार आहे.

**रेल्वेचें नवें वर्कशॉप**—ईशान्य रेल्वे मार्गावर मोगलगांव ह्या ठिकाणीं प्रवासी व वहातुकीचे डबे बांधण्यासाठी एक नवें वर्कशॉप स्थापन करण्यांत येणार आहे. येत्या ऑक्टोबरमध्यें कारखान्याच्या बांधकामास प्रारंभ होईल व तें तीन वर्षांत पुरें होईल. कारखान्याच्या उभारणीसाठी १४ कोटी रुपये खर्च येईल.

**गोध्रा म्युनिसिपालिटीला कर्ज नाकारलें**—गोध्रा म्युनिसिपालिटीनें १९४८ सालीं शहरासाठी विस्ताराची योजना तयार करून त्यासाठी मुंबई सरकारकडे ८ लाख रुपयांचें कर्ज मागितलें होतें. मुंबई सरकारनें कर्ज देण्याचें नाकारलें आहे. पण, सरकारनें योजनेसाठी कर्ज उभारण्यासाठी परवानगी मात्र दिली आहे.

**सहकारी साखर कारखाना**—निझामाबादपासून जवळच सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक साखरेचा कारखाना काढण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. कारखान्यासाठी सहा लाखांचें भांडवल गोळा करण्यांत आलें असून आंध्र सरकारकडून आर्थिक मदत मिळविण्याची खटपट चालू आहे.

**लोखंडाच्या खाणीचा शोध**—राजस्थानांत सवाई माधवपूर ह्या विभागांत लोखंडाच्या खाणी सांपडल्या आहेत ह्या खाणींतील लोहमिश्रित मातीपासून उत्तम प्रतीचें लोखंड तयार होण्यासारखें आहे असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. राज्यसरकारनें ह्या भागाची आणखी पहाणी करण्यासाठी तज्ज्ञांची कमिटी पाठविली आहे.

**सीलोनशीं सहकार्य**—सीलोनमधील उद्योगपतींशीं सहकार्य करून भारतीय उद्योगपती सीलोनमध्यें कारखाने काढण्याचा विचार करीत आहेत. दोन भारतीय उद्योगपतींनीं सीलोनमध्यें ह्या दृष्टीनें पहाणीहि केली आहे. शिवणाचीं यंत्रें व छताला लावण्याचे पंखे ह्या वस्तूंचे कारखाने काढण्याचा त्यांचा विचार आहे.

**पंजाब सरकारचा इशारा**—पंजाब सरकारच्या शेतकी खात्यानें शेतकऱ्यांना टोळधाड येण्याच्या धोक्याचा इशारा दिला आहे. पश्चिम आशिआंत व आफ्रिकेंत टोळधाडीचा उगम असून टोळांविरुद्ध करण्यांत आलेले उपाय अपुरे पडण्याचा संभव आहे.

**पाकिस्तानला वैद्यकीय मदत**—पूर्व पाकिस्तानांत गेल्या दोन महिन्यांत देवी व कॉलरा ह्या रोगांच्या साथींत १५,००० लोक मरण पावल्याचें समजतें. पाकिस्तानच्या आरोग्याधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी कित्येक अमेरिकन व रशिअन डॉक्टर्स औषधांसहित कळकत्त्यांत आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाच्या योजनांसाठी मध्यवर्ती सरकारचें साह्य

### मुंबई राज्याच्या वांट्यास ४३·६४ लाख रु.

निरनिराळ्या राज्यांतील व मध्यवर्ती शासित प्रदेशांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकरितां भारत सरकारनें १९५७-५८ साठीं ५०० योजनांस मंजुरी दिली आहे. छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकरितां राज्य सरकारांनीं या वर्षांत ४७२ योजना सादर केल्या होत्या. त्यासाठीं मध्यवर्ती सरकारकडून एकूण ४९२·०२ लाख रुपये आर्थिक साह्य मंजूर झालें आहे. त्याशिवाय मध्यवर्ती शासित प्रदेशांस त्यांच्या २८ योजनांसाठीं एकूण ३७·९१ लाख रुपये खर्चास मंजुरी देण्यांत आली आहे.

गतवर्षीं राज्य सरकारांनीं याबाबत ३१७ व मध्यवर्ती शासित प्रदेशांनीं २५ योजना सादर केल्या होत्या आणि त्यांसाठीं मध्यवर्ती सरकारनें अनुक्रमें ४४३·७० लाख रुपये व ५०·६४ लाख रुपये मंजूर केले होते.

१९५७-५८ साठीं मंजुरी मिळालेल्या योजनांत शिक्षण वा शिक्षण व उत्पादन-केंद्रें, संशोधन व प्रात्यक्षिक केंद्रें, प्रसिद्धि व दर्जा नियंत्रण योजना, नमुनेदार कारखाने, दुरुस्तीच्या सर्वसाधारण सोयींचीं केंद्रें व प्रायोगिक व्यापारी कारखाने यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणें, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील संकल्पित अशा छोट्या उद्योगधंद्यांच्या कार्यक्रमाची झपाट्यानें व चांगल्या प्रकारें अंमलबजावणी करण्यासाठीं राज्य सरकारांचे उद्योगधंदे विभाग जोमदार करण्याकरितांहि आर्थिक साह्य मंजूर करण्यांत आलें होतें.

त्याशिवाय दि स्टेट ॲड टु इंडस्ट्रीज ॲक्टानुसार छोट्या प्रमाणावरील औद्योगिक कारखान्यांस कर्जें देण्यासाठीं राज्य सरकारांकडे कांहीं रक्कम देण्यांत आली होती.

### राज्य सरकारांच्या योजना

छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकरितां राज्य सरकारांनीं आंखलेल्या योजना अनेक उद्योगधंद्यांसंबंधीं होत्या. त्या मुख्यत्वें फळ पदार्थ टिकविण्याच्या व पुढील वस्तू तयार करण्याच्या धंद्यांबाबत होत्या:—इलेक्ट्रिक ट्रॅन्सफॉर्मर्स, क्रीडा साहित्य, लांकडी व लोहार कामांतील वस्तु, प्लास्टिकच्या वस्तु, खेळणीं मातीच्या वस्तू, हातांनीं तयार केलेल्या आगकाड्या, कातडी, पादत्राणें व इतर माल, लाइट केमिकल्स, धातूचीं भांडीं, विजेचे पंखे सायकली व शिवण्याच्या यंत्रांचे सुटे भाग, पेन्सिली, शस्त्रक्रियेंतील हत्यारें, इत्यादि.

मध्यवर्ती सरकार राज्य सरकारांस छोट्या औद्योगिक कारखान्यासाठीं व्याजाच्या सवलतीच्या दरानें कर्जें देतें. या कार्यक्रमानुसार औद्योगिक सहकारी संस्थांस २½ टक्के दरानें व इतरांस ३ टक्के दरानें कर्जें देण्यांत येतात.


विजेचा वापर करणाऱ्या व ५० पेक्षा अधिक कामगार नसलेल्या किंवा वीज न वापरणाऱ्या व १५० हून अधिक कामगार नसलेल्या कारखान्यांस या सवलतींचा लाभ घेतां येतो. या कार्यक्रमाखालीं जास्तींत जास्त ५ लक्ष रुपये भांडवल गुंतविलेल्या छोट्या उद्योगधंद्यांस साह्य मिळतें. खाजगी औद्योगिक कारखान्यांस राज्य सरकारांच्या खात्यांकडून कर्जें मिळण्याची व्यवस्था होते.

१९५७-५८ साठीं वरीलप्रमाणें आर्थिक साह्य अनेक राज्यांस मिळालें असून, त्यांपैकी मुंबई राज्यास ४३.६४ लाख रुपये साह्य मिळालें आहे.


बचतीतून राष्ट्रसेवा
बचत करा — समृद्ध व्हा.
तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह. गिरगांव, मुंबई ४.
शाखा: फोर्ट, दादर, माहिम, खरकी, पुणें, बेळगांव.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

★ होतकरू संसारी तरुण-तरुणींसाठीं ★
श्री· वा· काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज
कण आणि क्षण रु. २=५०
पुढे पाऊल रु. २=००
तुमचें स्थान कोणतें ? रु. २=००
ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन तुमचें शुभचिंतन प्रभावी करा !
—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—


किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २१ मे, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीय हुंडणावळीचा बिकट प्रश्न

भारत सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं भारताच्या परदेशीय हुंडणावळीच्या बिकट परिस्थितीविषयीं कांहीं माहिती प्रकट केली आहे. पूर्व उत्तर प्रदेश चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासदांपुढें ते बोलत होते. श्री. शहा म्हणाले कीं १९६० सालीं, भारतामधील पहिला पोलाद् कारखाना प्रत्यक्ष उत्पादनाचें कार्य करूं लागेल; आणि मग भारताला परदेशीय चलनाबाबत ज्या कांहीं अडचणी सोसाव्या लागत आहेत त्या कमी होऊं लागण्याचा संभव आहे. सध्यां मात्र परदेशीय चलनाची परिस्थिति फार बिकट आहे. म्हणून ज्या नव्या उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी परदेशी चलन लागेल, अशा उद्योगधंद्यांना सरकारला उत्तेजन देतां येणार नाहीं. तेव्हा उद्योगपतींनीं देशांत तयार झालेली यंत्रसामुग्रीच वापरण्यास सुरवात केली पाहिजे; किंवा परदेशीय चलनविषयक परिस्थिति सुधारेपर्यंत थांबलें तरी पाहिजे. परदेशांतुन यंत्रसामुग्री आयात करण्यासाठीं सुमारें ८५,००,००० अर्ज अद्याप सरकारकडे पडून आहेत. ह्या मागण्या पुरविणें अतिशय अवघड आहे. उद्योगपतींना जर परदेशीय यंत्रसामुग्री पाहिजे असेल तर त्यांना रांगेंत उभे राहून आपल्या पाळीची वाट पाहिली पाहिजे. त्याचबरोबर आणखी एक सूचना करण्यासारखी आहे. उद्योगधंद्यांनीं आपली निर्यात वाढवून अधिक परदेशी चलन मिळविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. सध्यां चालू असलेल्या धंद्यांना कच्चा माल पुरविण्याचा सरकार जास्तींत जास्त प्रयत्न करील. पण भांडवली मालाच्या आयातीस मात्र परवानगी देणार नाहीं.

## व्यापारी तहाचीं बोलणीं फिसकटलीं

जपान व चीन ह्या देशांच्या दरम्यान व्यापारी तहाचीं बोलणीं चालू होतीं. उभयतां देशांतील व्यापाराची वृद्धि करण्यासाठी गेल्या फेब्रुआरींत एका करारावर सह्याहि करण्यांत आल्या होत्या, आणि तपशिलाच्या बाबी ठरविण्यासाठी चीनचें एक प्रतिनिधी मंडळ जपानला गेलें होतें. फेब्रुआरींत झालेल्या कराराप्रमाणें ५ वर्षांच्या कालावधींत उभयता देशांनीं १० कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण करण्याचें ठरविलें होतें. चालू वर्षी जपानमधील लोखंड-पोलादाचे कारखाने चीनला १,५०,००० टन पोलादाचा माल पुरविणार होते आणि त्याच्या बदला चीनकडून ४,००,००० टन कोळसा आणि ४,७०,००० टन अशुद्ध लोखंड घेणार होते. चीनला पोलाद पुरविण्यासाठी जपानमधील कारखाने जादा कामहि करूं लागले होते; परंतु चीनच्या प्रतिनिधी मंडळानें वाटाघाटी बंद करण्याचें ठरविल्यामुळें जपानच्या कारखान्यांना फार मोठें नुकसान सोसावें लागणार असा रंग आहे. हें संकट फक्त पोलाद् कारखान्यांपुरतेंच मर्यादित राहील असें नाहीं. त्याचा उपसर्ग इतर अनेक छोट्या उद्योगधंद्यांना लागण्याचा संभव आहे. जपानमधील पोलाद कारखान्यांचें उत्पादन ब्रिटनला विकता येण्याची थोडी-बहुत आशा आहे. वाटाघाटी मोडण्याचें कारण अद्याप समजलेलें नाहीं. परंतु जपानमधील सार्वत्रिक निवडणुकीवर परिणाम घडवून आणण्यासाठी चीननें हें राजकीय दडपण आणलें आहे, असा आरोप जपानचें सरकार करीत आहे.

## भारताचें संकल्पित चित्रवाणी केंद्र

भारत स्वतंत्र झाल्यापासून औद्योगीकरणाच्या क्षेत्रांत प्रगति करण्यांत येत आहे. आधुनिक राष्ट्रांतील समाज जीवनांत गेल्या कांहीं वर्षांत चित्रवाणीनें फार महत्त्वाचें स्थान पटकावलें आहे. तथापि, ह्या बाबतींत भारत मात्र अजून 'मागासलेला' ह्याच वर्गांत मोडत आहे. भारतामधील संकल्पित चित्रवाणी केंद्र मुंबई अगर दिल्ली येथें उभारण्यांत येणार आहे अशी माहिती नभोवाणी खात्याचे मंत्री डॉ. केसकर ह्यांनीं नुकतीच सांगितली आहे. चित्रवाणीच्या क्षेत्रांत इतर पुढारलेल्या राष्ट्रांनीं खुपच प्रगति केलेली आहे. ह्या बाबतींत पहिला क्रम अर्थातच अमेरिकेचा लागतो. चित्रवाणीचे सेट्स तयार करणें हा अमेरिकेंतील एक फार मोठा धंदा झालेला आहे. चित्रपटांना ही एक नवीनच स्पर्धा उत्पन्न झालेली आहे. सर्व जगांत सुमारें ५.६ कोटी चित्रवाणीचे सेट्स असावेत. त्यांपैकी सुमारें ४.२ कोटी सेट्स अमेरिकेंतच आहेत. अमेरिकेच्या खालोखाल ब्रिटनचा क्रम लागतो. ब्रिटनमध्यें ६० लाखांपेक्षा अधिक सेट्स आहेत. प्रत्येक दोन घरांपैकी एका ब्रिटिश घरांत चित्रवाणीचा सेट आहे. टेलिव्हिजन ब्रिटनमध्यें वाढत्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे. १९५२ सालीं ब्रिटनमध्यें चित्रवाणीसाठी जेवढे परवाने काढण्यांत आले त्याच्या तिप्पट परवाने १९५७ सालीं काढण्यांत आले. जगांतील मोठ्या राष्ट्रांत भारत हा एकच देश असा आहे कीं त्यांत चित्रवाणीचें केंद्र नाहीं. आशिआंत जपान व सयाम ह्या देशांत चित्रवाणी केंद्रें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत.

## बँक अधिकाऱ्यांना अमेरिकेंत व जपानमध्यें शिक्षण

अमेरिका आणि जपान या देशांत शिक्षण घेण्यासाठी बँकांच्या अधिकाऱ्यांची एकादी तुकडी पाठविण्याच्या योजनेवर विचार करण्यांत येत आहे, हें खरें असल्याचें मध्यवर्ती उपअर्थमंत्री श्री. बी. आर. भगत यांनीं लोकसभेंत सांगितलें. ना. मंत्री म्हणाले कीं, रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि भारतांतील कांहीं प्रमुख बँका यांच्या कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांना अमेरिकेंतील बँकिंग पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी आणि छोट्या उद्योगधंद्यांना पैसा पुरविण्याच्या जपानमधील तंत्राचें शिक्षण घेण्यासाठी त्या त्या देशांत पाठविण्याच्या एका योजनेवर विचारविनिमय चालू आहे. असें शिक्षण घेण्याकरितां बँकांचे अधिकारी त्या देशांकडे कधीं प्रयाण करतील तें आतांच सांगणें शक्य नाहीं, असें ते पुढें म्हणाले.

## फोर्ड फौंडेशनच्या साहाय्यानें खेड्यांची सुधारणा

फोर्ड फौंडेशनच्या आर्थिक साहाय्यानें भारतामध्यें अनेक विधायक कामांच्या योजना सुरू आहेत. त्या योजनांचें मार्गदर्शन मुख्यत्वें अमेरिकेंतील तज्ज्ञ लोक करितात. अमेरिकन इंजिनिअर्सच्या सल्ल्यानें ग्रामीण विभागांत जलद गतीनें सुधारणा घडवून आणण्याची अशीच एक योजना गेल्या कांहीं महिन्यापूर्वी सुरू झाली आहे. त्याचा येथें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्हीं योजलें आहे.

वरील योजनेची सुरवात करण्यासाठी दिल्लीजवळ खानपूर या खेड्याची निवड करण्यांत आली. त्यानंतर, गेल्या मार्च महिन्यांत या खेड्यांत या योजनेचा प्रारंभ करण्यांत आला.

आजपर्यंत सुमारें दोन लाख रुपये या खेडेगांवच्या कांहीं महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणण्यासाठी खर्च करण्यांत आले. याचा परिणाम म्हणून या गांवांतील सर्व जमिनीला अखंड पाणी पुरविण्याची व्यवस्था झाली आहे. विटांचा एक छोटा कारखाना व वीजनिर्मितीचें केंद्र निर्माण करण्यांत आलें असून त्यामुळें येथील बेकारी नष्ट होऊन, सर्व नैसर्गिक संपत्तीचा उपयोग होऊन, लवकरच्या काळांत त्या खेड्याचें रूपांतर एका सुधारलेल्या शहरांत होईल, अशी अपेक्षा आहे.

सायफनच्या तत्त्वावर पाण्याचा पुरवठा कायम राहील अशा नव्या तऱ्हेच्या सुमारें दहा विहिरी येथें खणण्यांत आल्या आहेत. त्यांना डिझेल पंप बसविण्याची व्यवस्था केली असून त्यामुळें या गांवांतील सुमारें पांचशें एकर जमिनीला सतत पाणी पुरवितां येईल. त्याचा परिणाम म्हणून वर्षांत दोनपेक्षा जास्त पिकें काढतां येतील व आज मिळणाऱ्या धान्याच्या उत्पन्नाच्या दुप्पट उत्पन्न सहज मिळूं लागेल.

कोळशावर चालणारी एक विटांची भट्टी एका नवीनच पद्धतीनें बांधली असून यांतून रोज सुमारें पंधराशें विटा तयार होतील. या विटांचा त्या खेड्यांतील विहिरी बांधणीस, रस्ते बांधणीस व घर बांधणीस भरपूर व चांगला उपयोग होईल.

याशिवाय, बैलांच्या जोडीनें ओढले जाणाऱ्या यंत्रावर एक इलेक्ट्रिक जनरेटर चालूं करण्यांत आला असून त्यामुळें गांवभर रस्त्यांवर व घरांमधून भरपूर वीज पुरवितां येईल. लहान गिरण्यांना व गृहोद्योगांना विजेचा उपयोग होऊं शकेल.

एक लाकूडकामाची गिरणी तेथें नुकतीच सुरू करण्यांत आली आहे. यामुळें बहुतेकांना काम व रोजंदारी मिळण्यास मदत होईल.

अशा रीतीनें, कांहीं महिन्यांत एका खेड्याचें स्वरूप बदलून टाकण्याची किमया करून दाखविणाऱ्या अमेरिकन तज्ज्ञांचा विश्वास असा आहे कीं, या गतीनें काम चालूं ठेवल्यास भारतांतील सर्व खेडीं पंधरा वर्षांच्या कालावधींत सुधारतां येतील.

**मा. द. आपटे**

---

**दुर्बिणींच्या कांचांचा कारखाना**—अलाहाबाद येथें दुर्बिणी, सूक्ष्मदर्शक यंत्रें, इत्यादि वस्तूंना लागणाऱ्या कांचांचा कारखाना काढण्याची शक्यता अजमावण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांचें एक मंडळ आलें आहे. अलाहाबाद जवळील कांहीं ठिकाणीं कांचेसाठी लागणारी माती मिळण्यासारखी आहे.

**स्वयंचलित रेल्वे एंजिन**—रशिअन एंजिनिअर्सनीं ड्रायव्हरशिवाय चालणारें रेल्वे एंजिन तयार केलें आहे. अशा प्रकारचें एंजिन हें जगांतील पहिलेंच असेल. ड्रायव्हरपेक्षाहि अधिक कुशलतेनें तें गाडी ओढतें असें म्हणतात. त्याची चांचणी यशस्वी झाली आहे.

## औद्योगिक यंत्रसामुग्रीच्या, विशेषतः मशीन टूल्सच्या, उत्पादनांत वाढ

भारतांत १९५७ मध्यें अवजड आणि हलक्या यंत्रसामुग्रीच्या व मशीन टूल्सच्या उत्पादनांत बरीच वाढ झाली. कापड गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीच्या उत्पादनांत विशेष वाढ झाली. १९५७ च्या पहिल्या अकरा महिन्यांत ८८३ कार्डिंग इंजिनें तयार झालीं. १९५६ मधील याच मुदतींतील हाच आंकडा ७२६ होता. त्याचप्रमाणें रिंग-फ्रेमची संख्या १११० वरून सदर वर्षांत वाढून १,२५५ वर गेली, तर ड्रॉइंग फ्रेमची संख्या २४ वरून ३० झाली. स्वयंचलित मागांची संख्या १६१ वरून २८२ वर गेली तर रिलिंग मशीनांची संख्या १,१५८वरून १,८४१ झाली. स्पीड फ्रेम, बंडलिंग व बेलिंग प्रेसेस यांचे उत्पादनांत वाढ झाली परंतु साध्या मागांच्या उत्पादनांत किंचित् घट झाली.

सदर उद्योगधंद्यानें स्थापनेनंतर अल्पावधींतच चांगली प्रगति साधली आहे. विशेषतः रिंगफ्रेम्स, माग आणि कार्डिंग एंजिनें या तीन प्रमुख सामुग्रीच्या बाबतींत, देशी कारखानदार आतां देशांतील मागणी बऱ्याच अंशीं पुरवूं शकतील.

### परकीयांचें सहकार्य

सदर वर्षांत ताग गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीचेंहि उत्पादन बरेंच वाढलें. साखर कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीच्या उत्पादनांतहि वाढ झाली. साखर कारखान्यांत ऊंसगाळणीचें यंत्र हें प्रमुख यंत्रांपैकी एक असतें. मुंबईतील एका फर्मनें या यंत्राच्या जुळणीचें काम चालूं करण्याच्या दृष्टीनें प्राथमिक व्यवस्था पुरी केलेली आहे. हें काम एका झेक फर्मच्या सहकार्यानें चालूं आहे. निर्वात काहिली, इत्यादि इतर यंत्रसामुग्रीचें उत्पादनहि ही फर्म करते. दुसऱ्या एका फर्मनें पश्चिम जर्मनींतील फर्मच्या सहकार्यानें जरूर ती बहुतेक यंत्रसामुग्री बसविली आहे. मद्रास फर्मनें मुंबई राज्यांतील चार सहकारी साखर कारखान्यांसाठी यंत्रसामुग्री तयार करून दिल्याचें समजतें.

सदर वर्षांत छापखान्यांतील यंत्रसामुग्रीच्या कारखानदारांनीं डुप्लेक्स प्रकारच्या स्टीरिओ रोटरी प्रिंटिंग मशीनचा प्रोटोटाइप तयार केला आहे.

कागद तयार करणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या उत्पादनाची शक्याशक्यता कितपत आहे, याची पाहणी एका समितीकडून चालू आहे. या बाबतींत इंग्लंड, स्विडन, व जर्मनी मधील कांहीं फर्मनीं सहकार्य देण्याची तयारी दाखविली आहे.

एका जपानी फर्मच्या सहकार्यानें घरगुती प्रकारचीं हातानें चालवावयाचीं विणकामाचीं यंत्रें तयार करण्याची योजना एका कारखानदारानें पाठविलेली असून सरकार त्या योजनेची तपासणी करीत आहे. औद्योगिक प्रकारच्या विणकामाच्या (निटिंग) यंत्रांचें उत्पादन देशांत यापूर्वीच सुरू झालेलें आहे.

### मशीन टूल्स उत्पादनांत १०० टक्के वाढ

सन १९५६ च्या उत्पादनाशीं तुलना करतां १९५७ मध्यें मशीन टूल्सचें उत्पादन जवळजवळ १०० टक्क्यांनीं वाढलें. बंगलूर येथील हिंदुस्तान मशीन टूल्स कारखान्यांच्या उल्लेखनीय उत्पादनवाढीमुळें, इतकी वाढ होऊं शकली. सदर कारखान्यांत दरमहा सुमारें ३० मशीन टूल्सचें उत्पादन झालें. अंबरनाथ येथील सरकारी क्षेत्रांतील दुसऱ्या फर्मनेंहि उत्पादनाबाबत प्रगति केली आहे. खासगी क्षेत्रांतील फर्म्सनींहि उत्पादनांत वाढ केली.

## 'जगण्याची कला' विशद करणारें पुस्तक

### तुमचें स्थान कोणतें ?

(लेखक : श्री. वा. काळे, पृष्ठसंख्या १२०, किंमत दोन रुपये, प्रमुख विक्रेते : अभिनव पुस्तक मंदिर, पुणें ४).

लेखविषयांची वैशिष्टयपूर्ण निवड व विषयप्रतिपादनाची आकर्षक मांडणी यामुळें सर्व थरांतील वाचकांचें लक्ष वेधून घेण्यांत गेल्या पांच वर्षांत जे ललितेतर लेखन करणारे मराठी लेखक यशस्वी झाले आहेत त्यांत श्री. श्री. वा. काळे यांचा क्रमांक फार वर लागेल यांत संशय नाहीं. मराठींतील सर्व प्रमुख नियतकालिकांत श्री. वा. काळे यांचे लेख वरचेवर पाहावयास मिळतात व अलीकडे ग्रंथनिर्मितिबाबतहि त्यांनीं भराभर पुढें पाऊल टाकावयास आरंभ केलेला आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. 'तुमचें स्थान कोणतें ?' हें त्यांचें तिसरें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें असून आधींच्या दोन पुस्तकांना पूरक होईल असाच त्याचा साज आहे.

### समाजसेवकाचा दृष्टिकोन

काळे यांच्या लेखणीला मानवी जीवनांतील व्यक्तींच्या सुख-दुःखांचें, अडीअडचणींचें, यशापयशाचें, गुंतागुंतीचें विलक्षण आकर्षण आहे. परंतु मानवी जीवनांतील या समस्यांसंबंधीं ललित माध्यमांतून ते लिहीत नाहींत. त्यांचा दृष्टिकोन रूढ अर्थानें कलावंताचा नाहीं. मात्र, असें म्हणतां येईल कीं, व्यापक अर्थानें त्यांचा दृष्टिकोन समाजसेवकाचा व शिक्षकाचा आहे. इतरांना कांहींतरी सांगावें, त्यायोगें त्यांचें जिवन अधिक सुखकर व यशस्वी करावें अशी त्यांना जबरदस्त प्रेरणा आहे आणि जुन्या-नव्या पिढींतील सर्वच वाचकांना सांगावें असें त्यांच्याजवळ मार्मिक निरीक्षणांतून आलेलें खूपच व्यावहारिक शहाणपण व अनुभव आहे. परंतु हें सांगतांना आपण कोणी तरी श्रेष्ठ आहों, सर्वज्ञ आहों, वरच्या पातळीवर आहों, अशी उच्च भूमिका ते कधींच घेत नाहींत. एखादा समवयस्क मित्र किंवा आप्त ज्या मोकळेपणानें, निरहंकारी वृत्तीनें, खिलाडूपणानें कांहीं सूचना करतो त्या खेळकर व निर्मळ भूमिकेवरून काळे नेहमींच लेखन करूं शकतात, हें खरोखरीच कौतुकास्पद आहे.

'तुमचें स्थान कोणतें ?' या त्यांच्या नव्या पुस्तकांत पति-पत्नींच्या खाजगी प्रश्नांपासून भारताच्या पंचवार्षिक योजनेपर्यंत-च्या सर्व प्रश्नांना त्यांनीं स्पर्श केला आहे. प्रत्येक बाबीचा किंवा घटनेचा विचार करतांना ते 'या सर्वांचा माझ्या वैयक्तिक जीवनाशीं नेमका कोठें व कसा संबंध पोंचतो' याचा विचार आपल्या वाचकांना करावयास लावतात. आपल्या नव्या पुस्तकांत त्यांनीं आपल्या वाचकांच्या जीवनांतील अनेक अडी-अडचणींना समर्पक उत्तरें देण्याचा प्रयत्न केला असून या जगांत आपलें स्थान कोणतें हें अचूकपणें हेरून तें सर्वांच्या सहकार्यानें मिळविण्यासाठी त्यांना आवाहन केलें आहे. 'जीवन जगण्याची कला' उत्कृष्ट रीतीनें विशद करणारें हें पुस्तक वाचकांना मार्ग-दर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.

### प्रतिपादनाचा गाभा

काळे यांनीं आपल्या डोळ्यांपुढें मुख्यतः मध्यमवर्गीय तरुण-तरुणींचा वाचकवर्ग ठेवलेला असतो असें दिसून येतें. विवाह व संसारांतील लहानसहान बाबी यशस्वी होण्यावर व्यवसायांतील व देशसेवेंतील कर्तबगारी फार अवलंबून असते असा त्यांच्या प्रतिपादनाचा गाभा असतो. यामुळें पुष्कळदां त्यांच्या लेखनांत पुनरावृत्तीचा दोष येणें अपरिहार्य होतें. परंतु त्यांचें लेखन कधींच कंटाळवाणें व नीरस होत नाहीं, याचें कारण ते वृत्तीनें 'आधुनिक पत्रकारा' प्रमाणें ताजेपणा, नवेपणा, टवटवीतपणा, यांचे भुकेले आहेत. त्यामुळें त्यांच्या प्रत्येक लेखांत व्यवहारांतील मार्मिक उदाहरणें, चटकदार गोष्टी व प्रचलित प्रसंगांचे समर्पक दाखले प्रसंगीं जरूरीपेक्षाहि अधिक भरलेले असतात. परंतु त्यामुळें ते वाचकाला 'उपदेश' करीत आहेत असा साज त्यांच्या लेखाला सहसा येत नाहीं व पूर्वी सांगितलेला मुद्दा पुनः सांगितला जात असूनहि तो सहसा कंटाळवाणा होत नाहीं.

काळे यांची आतांपर्यंतची लेखनविषयक कर्तबगारी पाहतां मराठी समाजानें त्यांच्याकडून अधिक भरघोस अपेक्षा बाळगणें सार्थ ठरेल यांत शंका नाहीं. काळे यांनीं मानवी जीवनांतील समस्यांकडे पाहण्याच्या आपल्या तत्त्वज्ञानविषयक भूमिके-संबंधीं आणि मध्यमवर्गीय वाचकवर्गाच्या बदलत्या मानसिक व वैचारिक गरजासंबंधीं आपल्या अभ्यासाच्या आधारें जर आवश्यक तेवढी अद्ययावतता ठेविली तरच त्यांच्या लेखनांतील आजची स्फूर्ति व आजचें मनोरम वैशिष्टय कायम राहील असें म्हणावेसें वाटतें. सर्व पुढारलेल्या देशांतून 'मार्गदर्शन' हें एक शास्त्र बनूं पाहात आहे. एखादें 'मार्गदर्शन केंद्र' काढून काळे यांनीं आपल्या सूचना, अनुभव व विचार अडचणींत असलेल्या स्त्री-पुरुषांना कितपत उपयोगी पडतात हें ताडून पहावें व जरूर तेथें सुधारणा करावी अशी सूचना करावीशी वाटते. प्रत्यक्ष अनुभूतीवर आधारलेलें व प्रयोगाच्या कसोटीला उतरलेलें विवेचन काळे यांच्या लेखनाला समृद्धता आणील व समाजाला अधिक उपयुक्त होईल असें वाटतें. —केसरी (२७-४-१९५८)

य. गो. नित्सुरे

---

### इंजिनियरिंग मालाच्या कारखानदारांपुढील प्रश्न

इंजिनियरिंग निर्यात वाढ मंडळाच्या विद्यमानें मुंबई येथें इंजिनियरिंग माल तयार करणारे कारखानदार व निर्यातदार यांची परिषद भरली होती. या परिषदेसमोर भाषण करतांना सदरहू मंडळाचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनीं इंजि-नियरिंग मालाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठीं या मंडळानें योजलेल्या उपाययोजनांचा उल्लेख करून स्वातंत्र्योत्तर काळांत भारतांत या धंद्याची उल्लेखनीय प्रगति होत आहे, ही गोष्ट निदर्शनास आणली.

निर्यातदारांपुढें असलेल्या प्रश्नांचा आणि विशेषतः पोलाद आणि वरड लोखंड यासारख्या कच्च्या मालाचा पुरेसा प्रमाणांत आणि नियमित पुरवठा होण्याबाबतच्या प्रश्नावर या परिषदेंत विचारविनिमय झाला. तसेंच निर्यात करावयाच्या मालाच्या बाबतींत कमी दरानें पोलाद आणि वरड लोखंड मिळण्याच्या प्रश्नाची तपासणी करण्यांत येऊन जहाज वाहतुकींतील अडचणी दूर करण्याच्या आवश्यकतेवरहि भर देण्यांत आला.

---

**सिनेमानटीची तक्रार**— सुप्रसिद्ध सिनेमानटी इन्ग्रिड बर्गमन हिनें ब्रिटिश टेलिव्हिजनवरील आपल्या मुलाखतींत अशी तक्रार केली कीं लोकांच्या जिज्ञासेमुळें आणि खाजगी गोष्टींत डोका-वण्याच्या वृत्तीमुळें प्रसिद्धीच्या प्रकाशांत वावरणाऱ्या लोकांच्या आयुष्याची माती होते. कोठल्याहि नटीला आपलें खाजगी जीवन वृत्तपत्रांत यावें असें वाटत नाहीं.

## सर जनार्दन मदन स्मारक फंडाला आणखी मिळालेल्या देणग्या

### फंड जमविण्याची मुदत वाढविली

[ कै. सर जनार्दन मदन ह्यांच्या स्मारकासाठीं बॉंबे स्टेट को. युनियनतर्फे एक फंड जमविण्यांत येत आहे. पुणें येथील को. ट्रेनिंग कॉलेजांत स्कॉलरशिपा व फेलोशिपा ठेवण्याकडे आणि मुंबई राज्यांतील सहकारी ट्रेनिंग स्कूल्समधील विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्याकडे फंडाचा विनियोग करण्यांत येणार आहे. फंडाला ह्यापूर्वी मिळालेल्या देणग्यांचा तपशील १८ सप्टेंबर, १९५७ च्या "अर्थ" मध्यें देण्यांत आला आहे. ]

| | रु. |
|---|---|
| कराड अर्बन को. बँक | ५१ |
| बांद्रा पीपल्स को. बँक | २५ |
| नासिक डि. को. बोर्ड | २५ |
| बॉंबे स्टेट इं. को. असोसिएशन | ५०० |
| बॉंबे प्रॉ. को. लँड मॉ. बँक | २,००० |
| साउथ सातारा डि. को. बोर्ड | ५१ |
| कोल्हापूर डि. को. सें. बँक | १०१ |
| अहमदाबाद डि. को. सें. बँक | १०१ |
| भिलोदा मल्टिपर्पज सोसायटी | ११ |
| कामगार कंझ्युमर्स सोसायटी, मुंबई | १०१ |
| बॉंबे म्युच्युअल स्टाफ को. के. सोसायटी | २५ |
| इंडियन टे. इं. को. के. सोसायटी, मुंबई | ५ |
| पू. खा. सें. को. बँक | २५१ |
| मिरज अर्बन को. बँक | १० |
| भडोच डि. को. बोर्ड | ५१ |
| अष्टा अर्बन को. बँक | २५ |
| मोरारजी गोकुळदास मिलहँडस को. के. सो. मुंबई | २५ |
| इंपीरिअल केमिकल एम्प्लॉईज को. के. सो. मुंबई | २१ |
| बी. ई. एस्. टी. एम्प्लॉईज को. के. सो. | ३१ |
| नगर डि. अ. सें. को. बँक | १०१ |
| प. खा. डि. को. लँड मॉ. बँक | २५ |
| पंचमहाल्स डि. को. बोर्ड | २५ |
| विजापूर श्री सिद्धेश्वर अ. को. बँक | ५० |
| सौराष्ट्र सें. को. लँड मॉ. बँक | १०१ |
| कॉलिअर्स को. एम्प्लॉईज सो. | ११ |
| नासिक ता. सु. युनियन | १५ |
| सांबरकाठा डि. को. बोर्ड | २५ |
| सौराष्ट्र स्टेट को. बँक | १०१ |
| नॉर्थ सातारा डि. को. बोर्ड | २५ |
| सा. सातारा डि. को. बोर्डानें जमा केलेली रक्कम | १५ |
| बार्शी सें. को. बँक | ५० |
| खेडा डि. मिल्क प्रोडयूसर्स युनियन | २५० |
| बांद्रा को. कंझ्युमर्स सोसायटी | २५ |
| श्री. जी. पी. मुर्डेश्वर | २५ |
| पुना पीपल्स को. बँक | ५१ |
| बरोडा डि. को. बोर्ड | ५१ |
| पैसाफंड शेतकी सहकारी बँक, हुपरी | १५ |
| पाचोरा को. लँड मॉ. बँक | १०० |
| गुजरात टोबॅको क. असो., नडियाद | २५ |
| कॉसमॉस अर्बन को. बँक, पुणें | २५ |
| भडोच डि. को. बँक | १०१ |
| मालवण अर्बन को. बँक | १५१ |
| झोरास्ट्रिअन को. बँक, मुंबई | ५१ |
| सातारा डि. को. लँड मॉ. बँक, कराड | ५१ |
| शेतकरी सहकारी संघ, कोल्हापूर | ५१ |
| पू. खा. ग. स. को. अ. बँक | २५ |
| राजापूर अर्बन को. बँक | ५१ |
| नॉर्थ सातारा डि. स्कूल बो. प्रा. टी. बँक. | २५ |
| पू. खा. जिल्हा को. लँड मॉ. बँक | २५ |
| नासिक डि. को. बँक | १०० |
| प्रवरा स. साखर कारखाना | १,००० |
| नासिक डि. को. लँड मॉ. बँक | २५ |
| बॉंबे को. हाउसिंग फिनॅन्स कॉर्पोरेशन | २५१ |

फंड जमविण्याची मुदत ३१ सप्टेंबर, १९५८ अखेर वाढविण्यांत आली आहे.

---

### झेकोस्लोव्हाकिआची औद्योगिक प्रगति

झेकोस्लोव्हाकिआच्या प्रकाशन खात्यानें 'जागतिक अर्थव्यवस्थेंत झेकोस्लोव्हाकिआचें स्थान' ह्या शीर्षकाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकांत दिलेल्या आंकडेवार माहितीवरून औद्योगिक विभागांत त्या देशानें विशेष प्रगति केल्याचें आढळून येतें. दुसऱ्या महायुद्धापूर्वींहि झेकोस्लोव्हाकिया हा देश औद्योगिक दृष्ट्या पुढारलेला होता. पण दुसऱ्या महायुद्धानंतर प्रगतीचा वेग वाढलेला दिसून येतो. १९३७ चे औद्योगिक उत्पादनाचे आंकडे लक्षांत घेतले आणि १९५६ च्या आंकड्यांशीं त्यांची तुलना केली, तर औद्योगिक उत्पादन २·७ पटीनें वाढल्याचें दिसतें. १९५७ सालीं तर उत्पादन तिपटीनें वाढलेलें आढळतें. औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रांतहि विशेषतः मशीन एंजिनिअरिंगच्या बाबतींत, विशेष प्रगति झाल्याचें दिसतें. ह्या क्षेत्रांतल्या कांहीं प्रकारच्या उत्पादनाच्या बाबतींत तर झेकोस्लोव्हाकिआनें इंग्लंड व फ्रान्स ह्यासारख्या राष्ट्रांनाहि मागें टाकलें आहे आणि पश्चिम जर्मनीसारख्या देशांशीं बरोबरी केली आहे. ग्राहकांना रोज लागणाऱ्या वस्तू उत्पन्न करणाऱ्या कापडासारख्या धंद्यांच्या बाबतींतहि सुधारणा झालेली आहे. दर माणसागणिक उत्पन्न करण्यांत येणाऱ्या कापडाचें प्रमाण पाहिलें तर झेकोस्लोव्हाकिआचा जगांत पहिला अनुक्रम लागतो. बीरदारू, साखर, मांस, ह्यांच्या उत्पादनांतहि प्रगति झालेली दिसून येते. दरमाणशीं उत्पादन करण्यांत येणाऱ्या शेतीच्या मालाच्या हिशेबीं झेकोस्लोव्हाकिआचें २६ युरोपीय देशांत ६ वें स्थान आहे. आर्थिक परिस्थितींत झालेल्या ह्या सुधारणेमुळें लोकांचें राहणीचें मानहि वाढत चाललें आहे.

---

**शास्त्रज्ञाच्या जीवनावर बोलपट**—दिवंगत हिंदी शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस ह्यांच्या १०० व्या जन्मतिथीनिमित्त भारत सरकारचें बोलपट खातें एक अनुबोधपट तयार करीत आहे. त्यांची १०० वी जन्मतिथि येत्या नोव्हेंबरमध्यें साजरी करण्यांत येणार आहे. त्या निमित्तानें पोस्टाचीं खास तिकिटेंहि काढण्यांत येणार आहेत.

**भारतीय संस्कृतीचें संशोधन**— भारतीय संस्कृतीचें संशोधन करणारी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याचा विचार भारत सरकार करीत होतें. पण आतां अशा एका संस्थेऐवजीं चार अगर अधिक स्थानिक संस्था स्थापन करण्याचा विचार करण्यांत येत आहे.

# अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४



# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

## –शेड्यूल्ड बँक–

ठेवीदार व खातेदार ह्यांनीं ठेवीच्या रूपानें ठेवलेल्या पैशांतूनच बँकेच्या प्राप्तींत वाढ होत असते. त्यांना त्याचा योग्य तो मोबदला मिळणें जरूर आहे.
बँकेच्या वाढत्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

–व्याजाचे दर–

चालू खातें: अर्धा टक्का, सेव्हिंग्ज खातें: २॥ टक्के.
मुदत ठेव तीन ते बारा महिने: ४ टक्के.
तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीच्या ठेवीवर आकर्षक व्याज.

★ आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवींमधून पैसा परत घेतांना कितीहि रक्कम काढावयाची असली तरी पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

चौकशी—(१) ४५५ रविवार पेठ, (२) ३६१ सदाशिव पेठ, (३) डेक्कन जिमखाना, पुणें. (४) सांगली.

गो. गं. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक — चेअरमन



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४२,०८,००० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ६६,००,००० |
| | रु. १,०८,०८,००० |
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ६०,७६,००० |
| एकूण ठेवी : | रु. ११,००,२६,००० |
| खेळतें भांडवल : | रु. २०,५०,००,००० |

## ११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

---

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,३५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार टक्के)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

---

स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० | |
| जमा भांडवल | रु. ९१,००० | |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक | |
| ठेवी | रु. ६,००,००० | ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० | ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

| | |
|---|---|
| श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, | ( अध्यक्ष ) |
| श्री. गे. गो. ढोले, | ( उपाध्यक्ष ) |
| श्री. उ. भा. तांबे, | ( ऑ. मॅ. डायरेक्टर ) |
| श्री. म. बा. बेंडे, | ( ऑ. खजिनदार ) |
| श्री. म. मा. वामन | डायरेक्टर |
| श्री. गे. ल. पाटील नलवडे | ,, |
| श्री. आ. पां. ढोर | ,, |
| श्री. ज्ञा. मा. मनसुख | ,, |
| श्री. म. रा. नेहरकर | ,, |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

---

सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )
मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, चौदा लाखांचेवर |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.